**ठळक बातम्या**

- भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार समारोप

- सीमा सुरक्षा दलाच्या साठाव्या वर्धापन दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून कौतुक आणि अभिनंदन

- तेलंगणात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत सात नक्षलवादी ठार

  **आणि**

- फेंगल चक्रिवादळाची तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या किनारपट्टीला धडक, चार राज्यांना चक्रिवादळाचा फटका, वीज कोसळून तीन जण दगावले

**<><><><><>**

ओडिशात भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते परिषदेचं २९ तारखेला उद्घाटन करण्यात आलं होतं. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलिस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ, राष्ट्रीय सुरक्षा दल - एनएसजी, गुप्तचर विभाग आणि विशेष सुरक्षा दल - एसपीजीचे प्रमुख या परिषदेला उपस्थित आहेत.

नवे फौजदारी कायदे, दहशतवाद आणि नक्षलवादाला प्रतिबंध, किनारी सुरक्षितता, अमली पदार्थांची तस्करी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोनसारख्या तंत्रज्ञानामुळं निर्माण होणारी आव्हानं यासह राष्ट्रीय सुरक्षिततेसंदर्भात महत्वपूर्ण बाबींवर या परिषदेत चर्चा होत आहे.

तत्पूर्वी काल प्रधानमंत्री मोदी यांनी उच्च पोलीस अधिकारी आणि विविध सुरक्षा संस्थांच्या प्रमुखांशी राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर काल ओडिशात भुवनेश्वर इथं चर्चा केली. अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेत पंतप्रधानांनी पोलिसांना भेडसावणाऱ्या विविध कार्यान्वयन आणि पायाभूत सुविधांशी संबंधित समस्यांवरही चर्चा केली.

**<><><><><>**

सीमा सुरक्षा दल आज आपला ६० वा वर्धापन दिन साजरा करत आहे. प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी सीमा सुरक्षा दलाच्या कामगिरीचं कौतुक करत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे दल म्हणजे धैर्य, समर्पण आणि असामान्य सेवेचं प्रतीक असून या दलाची दक्षता आणि शौर्यानं  आपल्या देशाच्या सुरक्षिततेत कायमच महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही सीमा सुरक्षा दलाला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

आज जागतिक एड्स दिन. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना-नाकोच्या वतीनं १९९२ पासून दरवर्षी १ डिसेंबर ला जागतिक एड्स दिवस पाळला जातो. या औचित्यानं आज मध्यप्रदेशातल्या इंदुर इथं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते एड्स दिवस २०२४ या कार्यक्रमाचं उद्घाटन होत आहे. सही रास्ते पर चले ही या वर्षीच्या एड्स दिवसाची संकल्पना आहे. एच आय व्ही बद्दल जागरुकता वाढवणं, उपचारासाठी अधिकार- आधारित दृष्टीकोनाला चालना देणं तसंच एचआयव्हीने प्रभावित लोकांविरुद्ध भेदभाव संपवणं या उद्देशानं आज देशभरात अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या वर्षीच्या एड्स

दिनानिमित्त, जागरुकता वाढवणं, एचआयवी/एड्स झालेल्यांविरुद्धचा भेदभाव नष्ट करणं यावर लक्ष केंद्रित केलं जाणार आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळा होणार असून ४३ कोटींहून अधिक भाविक या सोहळ्याला हजेरी लावतील अशी अपेक्षा आहे. या भाविकांच्या सुविधेसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशातल्या रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. ६३ पूर्णांक १७ शतांश किमी लांबीच्या रायबरेली-प्रयागराज राष्ट्रीय महामार्गाचं रुंदीकरण, चार ठिकाणी चौपदरी बायपास, प्रयागराज इनर रिंग रोड फाफामाऊ इथं गंगा नदीवरच्या सध्याच्या पुलाला समांतर सहा पदरी पूल बांधणं, यासह अनेक प्रकल्पांचा आढावा यावेळी घेतला गेला.

गुणवत्ता आणि सुरक्षा निकषांचं काटेकोरपणे पालन करून सर्व बांधकामं वेळेत पूर्ण करायचे तसंच, २५ डिसेंबरपर्यंत कामं पूर्ण करायचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. प्रमुख महामार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे, पथदिवे आणि सुरक्षा यंत्रणा बसवायचे निर्देशही मंत्र्यानी अधिकाऱ्यांना दिले असून रुग्णवाहिका, गस्ती पथकं आणि वैद्यकीय-आणि-वाहतूक-सहाय्यासारख्या अतिरिक्त सुविधा पुरवण्यावरही भर दिला जाणार आहे.

<><><><><>

जबरदस्तीने होणारं धर्मांतर रोखण्यासाठी धर्मांतर विरोधी विधेयकाच्या मसुद्याला राजस्थान मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून 'राजस्थान बेकायदेशीर धर्मांतर बंदी विधेयक २०२४' या नावाचं हे विधेयक आता राजस्थान

विधानसभेच्या आगामी अधिवेशनात मांडलं जाणार आहे. जर एखाद्या व्यक्तीला धर्मांतर करायचं असेल तर, त्या व्यक्तीला ६० दिवस अगोदर जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज द्यावा लागेल, असा प्रस्ताव या विधेयकात असल्याची माहिती राजस्थानचे संसदीय कामकाज मंत्री जोगाराम पटेल यांनी दिली आहे. धर्मांतर सक्तीने किंवा कोणत्याही प्रलोभनाखाली झालेलं नाही, असं आढळून आलं तर, अर्जदाराला धर्मांतराची परवानगी दिली जाईल. या विधेयकाचा कायदा झाल्यानंतर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था चुकीची माहिती, फसवणूक, जबरदस्ती किंवा अवाजवी प्रभाव वापरून एखाद्या व्यक्तीचं धर्मांतर करू शकणार नाही.

**<><><><><>**

संदेश सेवांचा गैरवापर रोखण्याच्या उद्देशानं व्यावसायिक संदेश पाठवणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात ट्रायनं लागू केलेल्या उपाययोजनांचा परिणाम दिसून येत आहे. त्यानुसार २७ हजारांहून अधिक प्रमुख संस्थांनी संबंधित प्रवेश प्रदात्यांकडे त्यांच्या प्रमुख संदेश साखळ्यांची नोंदणी केली असून पुढील नोंदणी देखील वेगानं होत आहे, अशी माहिती केंद्रीय दूरसंवाद मंत्रालयानं दिली आहे.

सेवा प्रदात्यांनी व्यावसायिक संदेश पाठवणाऱ्या सर्व प्रेषकांकडून प्राप्तकर्त्यांपर्यंतच्या सर्व संदेशांचा माग शोधून काढण्यासाठी ट्रायनं मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या.

**<><><><><>**

तेलंगणात, मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत किमान सात जहाल नक्षलवादी ठार झाले. या नक्षल्यांमध्ये राज्य समितीचा सचिव भद्रू उर्फ पपण्णा हा विजापूरचा असून इतर दोन राज्य समिती सदस्यांचा समावेश

आहे. पोलिसांचे खबरे असल्याचं सांगून त्यांनी दोन आदिवासींना ठार मारल्यानंतर काही वेळातच ही चकमक झाली.

एटुरनगरम भागात नक्षलविरोधी कमांडो पथकाला आज सकाळी शोध मोहिमेदरम्यान नक्षलवाद्यांच्या हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर हा गोळीबार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी दोन एके-४७ रायफलही त्यांच्याकडून जप्त केल्या आहेत.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या फेंगल चक्रिवादळाने काल रात्री तामिळनाडू आणि पुद्दुचेरी किनारपट्टीवर कराईकल आणि महाबलीपुरम दरम्यान धडक दिली. ताशी ९० किलोमीटरपर्यंत वाऱ्यांसह तामिळनाडू आणि शेजारच्या पुद्दुचेरीमध्ये २० सेंटीमीटर्सपर्यंत पाऊस पडला. वीज अंगावर पडून काल तीन जणांचा मृत्यू झाला. पावसामुळं बस, रेल्वे आणि विमान सेवांसह सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम झाला. ही वाहतूक आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. असुरक्षित भागातील लोकांना अधिकाऱ्यांनी सुरक्षित आश्रयस्थानांमध्ये हलवलं आहे. भारतीय हवामान विभागानं तामिळनाडू, दक्षिण आंध्र प्रदेश, केरळ आणि अंतर्गत कर्नाटकातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर रेड अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**

आम आदमी पार्टीचे आमदार नरेश बलयान आणि गँगस्टर कपिल संगवान यांच्यातल्या कथित संभाषणाच्या रेकॉर्डिंग प्रकरणी तपास सुरू असल्याचं दिल्ली पोलिसंनी आज वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. गँगस्टर कपिल संगवान आणि आणि बलयान यांच्यात काय संबंध आहेत हे तपासलं जात आहे, असं पोलिसांनी सांगितलं. नरेश बलयान यांना खंडणी प्रकरणी काल अटक करण्यात आली.

<><><><><>

बांग्लादेशमधील हंगामी सरकार देशातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात अपयशी ठरल्याबद्दल तिथल्या प्रमुख व्यवसायिकांनी चिंता व्यक्त केली आहे. ढाका चेंबर ऑफ कॉमर्सद्वारे आयोजित एका व्यवसाय परिषदेत बोलताना या प्रमुखांनी सांगितलं की बांग्लादेशातील अस्थिर परिस्थिती अशीच कायम राहिली तर अर्थव्यवस्था स्थिर राखणं अवघड होईल.

<><><><><>

अमेरिकेच्या ‘एफबीआय’ अर्थात, ‘फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन’ या गुप्तचर यंत्रणेच्या प्रमुखपदी भारतीय वंशाचे काश पटेल यांची नियुक्ती झाली आहे. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही नियुक्ती केली आहे. या नियुक्तीनंतर अमेरिकेच्या प्रशासनातली भारतीय वंशाचे असलेल्या दुसऱ्या व्यक्तीची ही नेमणूक आहे. काश हे एक उत्तम वकील आणि अन्वेषक असून भ्रष्टाचार उघडकीला आणण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.